**जिल्हा परिषदेच्या स्वउत्पन्नाच्या अर्थसंकल्पात ३ % निधी अपंग व्यक्तींच्या कल्याण व पुर्नवसनाकरीता राखून ठेवणे. तसेच जिल्हा परिषद स्वउत्पन्नामधील वैयक्तिक लाभांच्या योजनेतील एकूण लाभार्थ्यांपैकी ३% लाभार्थी अपंग असण्याबाबत.**

**अपंग कल्याण कृती आराखडा-२००१**

**महाराष्ट्र शासन**
ग्रामविकास व जलसंधारण विभाग
शासन निर्णय क्र. संकीर्ण-२००७/ प्र.क्र.४८७१/वित्त-३
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दि.०५/१०/२०१२

संदर्भ क्र. : १) शासन निर्णय समक्रमांक दि. १८/१०/२००७.

**" जिल्हा परिषदेच्या स्वउत्पन्नातून ३% निधी अपंग व्यक्तींच्या कल्याण पुनर्वसनाकरिता राखून ठेवण्याबाबतचा विभागाचा सम क्रमांक दि. १८/१०/२००७ चा शासन निर्णय रद्द करण्यात येत असून या संदर्भात पुढील प्रमाणे सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे ."**

**प्रस्तावना :-** महाराष्ट्र राज्याचा सन २००१ मध्ये अस्तित्वात आलेल्या अपंग कल्याण कृती आराखडयामधील रोजगार व स्वयंरोजगार विषयक उपाययोजना या सदराखालील अनुक्रमांक ६ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय योजना, केंद्र शासनाच्या योजना, दारिद्रय निर्मूलन योजना या अंतर्गत किमान ३ %लाभार्थी हे अपंग असतील, याबाबत उपाययोजना करण्यात येईल तसेच अनुक्रमांक ९ मधील सूचनेनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या एकूणनिधीपैकी ३ % निधी अपंग व्यक्तींच्या कल्याण व पुर्नवसनाकरीता राखून ठेवण्याबाबत कारवाई करण्यात येईल असे स्पष्ट केले आहे.

तथापि, या कृती आराखडयानुसार केवळ जिल्हा परिषदांना, त्यांच्या स्वउत्पन्नातून ज्या काही वैयक्तिक लाभाच्या योजना राबविण्यात येणार आहेत, त्या योजनेच्या एकूण लाभार्थ्यांपैकी ३%लाभार्थी हे अपंग प्रवर्गातील असावेत, असा निर्णय शासनाने संदर्भीय शासन निर्णय समक्रमांक, दि.१८/१०/२००७ अन्वये घेतला होता. मात्र जिल्हा परिषदांना त्यांच्याकडील स्वनिधीच्या कमतरतेमुळे संदर्भीय शासन निर्णयात जिल्हा परिषदांना त्यांच्या

एकूण स्वउत्पन्नाच्या ३ % निधी अपंगांच्या कल्याण व पुर्नवसनाकरीता राखून ठेवता आला नाही.

यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने, रिट याचिका क्र. ११८/२०१० संदर्भात दि.१८/३/२०११ रोजी असे आदेश दिले आहेत की, नवीन अपंग कल्याण कृती आराखडा तयार होईपर्यंत पूर्वीच्या कृती आराखडयाची अंमलबजावणी करण्यात यावी. न्यायालयाचे आदेश पहाता, वरील अपंग कल्याण कृती आराखडा, २००१ मधील स्थानिक स्वराज्य संस्थांकडील एकूण निधीपैकी ३ % निधी अपंगांकरीता राखून ठेवण्याबाबत शासनाने निर्णय घेतलेला नव्हता. मात्र राज्यभरातून घेतलेल्या जिल्हा परिषदेकडील माहिती नुसार राज्यातील बऱ्याच जिल्हा परिषदा त्यांच्या स्वउत्पन्नाच्या निधीमधून ३% निधी अपंगांच्या कल्याण व पुनर्वसनाकरिता राखून ठेवत आहेत. मात्र काही जिल्हा परिषदांकडून असा निधी राखून ठेवला जात नाही. असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. तसेच वरिल अपंग कल्याण कृती आराखडा २००१ नुसार ज्या काही लाभार्थ्यांकरिता योजना आहेत त्यातही ३% लाभार्थी अपंग असावेत याबाबत सुस्पष्ट आदेश देणे आवश्यक आहे.

**<u>शासन निर्णय :-</u>**

मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ११८/२०१० द्वारे अपंग कल्याण कृती आराखडा, सन २००१ संदर्भात दिलेला निर्णय विचारात घेता शासन या आदेशाद्वारे सर्व जिल्हा परिषदांना असे आदेश देत आहे की, त्यांनी त्यांच्या एकूण स्वउत्पन्नामधील ३ % निधी अपंगांच्या कल्याण व पुर्नवसनाकरीता राखून ठेवावा. व या निधीचा विनियोग महाराष्ट्र शासनाच्या अपंग कल्याण कृती आराखडा, २००१ नुसार अपंगांकरीताच केला जाईल याची कृपया दक्षता घ्यावी. तसेच या सन २०१२-१३ या वित्तीय वर्षाकरिता अपंगांकरिता स्वउत्पन्नातील ३ % निधी पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध करण्यात यावा. व जिल्हा परिषदांनी पुढील प्रत्येक वित्तीय वर्षाकरिता ३ % निधीची तरतूद त्यांच्या अर्थसंकल्पात नियमितपणे करावी.

जिल्हा परिषदेच्या स्वउत्पन्नामधून महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील कलम १०० ला जोडलेल्या अनुसूची १ मध्ये नमूद केलेल्या बाबींवर स्थानिक स्तरावरील आवश्यकतेनुसार खर्च करावा लागतो. त्यानुसार जिल्हा परिषदेच्या स्वतःच्या अर्थसंकल्पातुन सामूहिक विकास तसेच वैयक्तिक लाभाच्या योजनांचीसुध्दा

अंमलबजावणी होत असते. करिता या संदर्भातसुध्दा मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या सूचनेनुसार जिल्हा परिषदेच्या स्वनिधीतून ज्या वैयक्तिक लाभाच्या योजना राबविण्यात येतील त्या योजनेच्या एकूण पात्र लाभार्थ्यांपैकी ३% लाभार्थी अपंग प्रवर्गातील निवडावेत असेही आदेश देण्यात येत आहेत. तथापि, अपंग प्रवर्गातील लाभार्थी उपलब्ध न झाल्यास विहित कार्यपध्दतीनुसार संबंधीत योजना ज्या प्रवर्गाकरीता असेल त्या प्रवर्गातील अन्य लाभार्थ्यांचा त्याकरीता विचार करण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०१२१००५१३४९०६४१२०असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

(प्रि.श्री.कांबळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.सचिव, ( सर्व मंत्रालयीन विभाग )
मा.लोकायुक्त कार्यालय, नवीन प्रशासन भवन, १ ला मजला, मादाम कामा रोड,मुंबई - ३२
महालेखापाल, महाराष्ट्र -१ (लेखापरीक्षा), मुंबई (पाच जादा प्रतींसह)
महालेखापाल, महाराष्ट्र -१ (लेखापरीक्षा), मुंबई (पाच जादा प्रतींसह)
सर्व विभागीय आयुक्त,
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, बेलापूर, नवी मुंबई
उपमुख्य लेखा परिक्षक,स्थानिक निधी लेखा (वरिष्ठ) पुणे, औरंगाबाद, नागपूर, अमरावती नाशिक, कोकण,कोकण भवन, बेलापूर, नवी मुंबई
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
संगणक कक्ष, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
निवड नस्ती, का.क्र. वित्त-३, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२